उपाययोजना

१. जनावरांना सर्पदंश झाल्याचे निदान झाल्यास दंश झालेल्या ठिकाणी रक्तस्राव, सूज येणे अशी लक्षणे अर्ध्या तासात दिसून आल्यास तात्काळ पशुवैद्यकाकडून योग्य औषधोपचार करून घ्यावा.

२. सापाच्या रंगावरून सर्वसाधारणपणे सापाचा प्रकार ओळखायला सोपे असून असा साप विषारी आहे किंवा नाही याची खात्री करावी.

३. सर्पदंश झाला म्हणून किंवा जनावराच्या शेजारून साप गेलेला पाहून पशुपालकानी अजिबात घाबरून जाऊ नये. आपल्या जनावरांस पायावर किंवा तोंडावर सूज येण्यास सुरवात होणे किंवा दंश झालेल्या ठिकाणी रक्त दिसणे व रक्तस्राव दिसल्यास पशुवैद्यकीय मदत घ्यावी. अन्यथा जनावरास विषबाधा झालेली नसल्यामुळे कोणतेही लक्षण दिसत नाही अशावेळी जनावर फक्त निरीक्षणाखाली ठेवावे.

४. पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे गेली १५ वर्षे सर्पदंश बाधित गायी–म्हशीमध्ये नियमित निदान व उपचार केले जातात. सर्पदंश उपचारासाठी अत्यंत उपयुक्त अशी उपचारपद्धती (पॉलीव्हॅलन्ट ॲन्टी स्नेक व्हेनम व तत्सम उपचारपद्धती) विकसित करण्यात आलेली असून या उपचारपद्धतीचा अवलंब केल्यास मरतुक कमी होवून बाधित जनावरांमधील बरे होण्याचे प्रमाण लक्षणीय (८८%) आढळून आले.

५. पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे रक्तविषारी सर्पदंशामध्ये रक्तबिंबिका पेशी ५०००० /मिली पेक्षा कमी झालेल्या गायी–म्हशीमध्ये रक्त संक्रमण व तत्सम उपचारपद्धती अवलंब केलेल्या समूहात ८७.५०% जनावरे पूर्णपणे बरी झाली तर रक्तसंक्रमण विरहित तत्सम उपचारपद्धती अवलंब केलेल्या समूहात ७५% जनावरे पूर्ण बरी झाली.

प्रतिबंध

१. जनावरांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देणे.

२. गोठा व परिसर स्वच्छ असावा.

३. चराऊ जनावरांना दाट कुरणात चरावयास सोडू नये किंवा सोडल्यास निरीक्षणाखाली ठेवावे.

४. शक्यतो जनावरांचे गोठ्यामध्ये (मुक्त संचार गोठा) संगोपन करणे.



सर्पदंश बाधित पशूच्या पायावर सापाच्या दातांच्या खुणा

लेखक

प्रा. डॉ. अनिल भिकाने

संचालक, विस्तार शिक्षण

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

व

डॉ. रविंद्र जाधव

सहाय्यक प्राध्यापक

चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग,

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/६/२०२५

गायी–म्हशीतील विषारी सर्पदंश



प्रकाशक

विस्तार शिक्षण संचालनालय

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१

टोल फ्री क्रमांक – १८००–२३३–३२६८

संकेतस्थळ – www.mafsu.ac.in

प्रस्तावना

आपल्या देशात जवळपास ६० विषारी सापांच्या प्रजाती आढळून येतात त्यापैकी नाग, मण्यार, फुरसे व घोणस या अत्यंत विषारी प्रजाती आहेत. शेतकरी, शेतमजूर व चरावयास जाणारी जनावरे प्रामुख्याने सर्पदंशास बळी पडतात. पावसाळ्यात कुरणे व जंगल क्षेत्रात उंच वाढलेल्या दाट गवतात जनावरे चरावयास गेल्यास सर्पदंशाची शक्यता अधिक असते. ग्रामीण भागामध्ये मशागतीची कामे आटोपून चरावयास सोडलेले बैल या आजारास जास्त प्रमाणात बळी पडतात. याशिवाय कुरणामध्ये चरणाऱ्या गायी–म्हशी या सकाळ व संध्याकाळच्या वेळेत सर्पदंशास अधिक बळी पडतात. गोठ्याशेजारी स्वच्छता नसेल व अडगळीची जागा असेल तर निवाऱ्यासाठी गोठ्यात बांधलेली जनावरेही सर्पदंशास बळी पडू शकतात.



नाग मण्यार



घोणस फुरसे

लक्षणे

सापाच्या प्रजातीप्रमाणे प्रामुख्याने सहा वेगवेगळ्या प्रकारचे विष जसे कि नेक्रोटीक, मज्जासंस्थेस बाधा करणारे, रक्त गोठवण थांबवणारे, रक्त गोठविणारे, पेशींना इजा करणारे, रक्तातील लाल पेशींना इजा करणारे व रक्तस्राव करणारे विष, बाधित जनावरांत लक्षणे व विषबाधा करण्यास कारणीभूत ठरतात. सर्वसाधारणपणे नागाचा व मण्यारचा दंश झाल्यास मज्जासंस्था बाधित होवून अर्धांगवायू सदृश लक्षणे आढळून येतात, तर घोणस व फुरसे यांचा दंश झाल्यास रक्तातील घटकांशी निगडीत लक्षणे दिसून येतात. विविध विषारी सर्पदंशामुळे जनावरांत दिसून येणारी प्रमुख लक्षणे खालीलप्रमाणे.

१. नाग (कोब्रा) दंश: या प्रजातीच्या सापांमध्ये प्रामुख्याने मेंदू व हृदय या अवयवांना इजा करणारे विष असते. दंश झाल्यानंतर बाधित पशूंमध्ये दंश झालेल्या जागेवर सूज येते, अर्धांगवायू सदृश लक्षणे दिसतात, तोंडातून लाळ गळते व जनावराचा तोल जातो. वेळेत उपचार न झाल्यास अशी जनावरे श्वसनास त्रास होवून मृत्यूमुखी पडतात.

२. मण्यार (क्रेट) दंश: दंश झालेल्या ठिकाणी मोठी सूज येते, श्वसनाचा वेग वाढतो, रक्तस्राव होतो, हृदयाचे ठोके वाढतात, काहीवेळा ताप येतो, अशक्तपणा व नंतर बसून राहणे अशी लक्षणे दिसून येतात.

३. फुरसे व घोणस (व्हायपर) दंश: बाधित जनावरांच्या शरीरावर ज्या ठिकाणी दंश केला आहे त्या ठिकाणाहून रक्तस्राव होतो, पायावर दंश झाल्यास सूज वरच्या दिशेने चढत जाते, वेदना होणे, अस्वस्थ वाटणे, चालताना लंगडत चालणे, खाणे–पिणे मंदावणे इत्यादी लक्षणे आढळून येतात. दंश तोंडाच्या भागामध्ये झाला असल्यास तोंडावर जास्त प्रमाणात सूज येते व ती खालच्या बाजूस असेल तर श्वसनास त्रास होतो व योग्य उपचार न झाल्यास असे जनावर दगावू शकते. या सर्पदंशात रक्त गोठवणाऱ्या पेशींची (रक्तबिंबिका/ प्लेटलेट्स) संख्या



कमी होते. योग्य व वेळेत उपचार न झाल्यास अशा बाधित जनावरांमध्ये विविध अवयवातून रक्तस्राव होऊ शकतो जसे कि नाकातून, आतड्यातून (रक्तमिश्रित शेण), लघवीतून (रक्तमिश्रित/ लाल लघवी) रक्तस्राव होवून रक्तक्षय होतो.

निदान

पशुपालकाने जनावराला सापाने चावा घेतल्याचे पाहणे किंवा कुरणामध्ये चरताना जनावर एकदम भीतीने ओरडणे, उड्या मारणे किंवा जास्त अस्वस्थ होणे अशी लक्षणे व तदनंतर पायावर किंवा तोंडावर सूज येणे, दंशाच्या ठिकाणाहून काही प्रमाणात रक्तस्राव होणे आदि माहिती सर्पदंशाच्या प्राथमिक निदानात महत्वाची ठरते. रक्त तपासणी व रक्त गोठवण वेळ तपासणी अंती रक्त गोठवणाऱ्या पेशींची (रक्तबिंबिका/ प्लेटलेट्स) संख्या कमी झाल्याचे व रक्त गोठण्यास जास्त वेळ (> २० मिनिटे) लागत असल्याचे दिसून येते.